गिरीश महाजनांचे निकटवर्तीय राष्ट्रवादीच्या वाटेवर
>>पान 2

मतदारसंघात चार हजार कोटींपेक्षा जास्त रक्कमेची विकासकामे
>>पान 3

देशी दारुची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर पथकाची कारवाई; २१ बॉक्ससह दोन आरोपी अटकेत
>>पान 4


**सुविचार**

जीवन ही एक जबाबदारी आहे.
क्षणाक्षणाला दुसऱ्याला सांभाळत न्यावं लागतं.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

मी स्वत:ला खूप भाग्यवान समजते ब्रेकअपच्या बातम्यांदरम्यान मलायका बोलली तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल
आतील पान


■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 73 ■ शनिवार, दि. 19 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# महाविकास आघाडीत बिघाडीचे संकेत

## नाना पटोलेंसोबत चर्चा करण्यास ठाकरे गटाचा नकार, काँग्रेसच्या वरिष्ठांशी साधला संपर्क

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात असतानाच आता महाविकास आघाडीत जागावाटपावरुन खडाजंगी होत असल्याचं स्पष्ट होत आहे. कारण, नाना पटोले यापुढे जागावाटपाच्या बैठकीत असल्यास शिवसेना ठाकरे गटाचे नेते जागा वाटपाच्या बैठकीला उपस्थित राहणार नाहीत, अशी भूमिका शिवसेना ठाकरेंच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. महाविकास आघाडीतील जागावाटप हे नाना पटोले यांच्या भूमिकेमुळे आडत असल्याचं ठाकरेंच्या शिवसेनेचं म्हणणं आहे. विशेष म्हणजे याबाबत दिल्लीतील काँग्रेसकडे नाना पटोले यांची तक्रारही करण्यात येणार आहे.



जागावाटपाची चर्चा ठाकरेंचे नेते हे काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींशी करत आहेत, तिढा असलेल्या जागा लवकरात लवकर सोडवण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले जावे, अशी भूमिका ठाकरेंच्या शिवसेनेची आहे. मात्र, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या भूमिकेवरुन व सहभागावरुन आता महाविकास आघाडीत बिघाडी होत असल्याचं स्पष्ट झालंय.

महाविकास आघाडीमध्ये विदर्भातील वाढीव जागांसाठी ठाकरे गट आग्रही असताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विदर्भात जागा न सोडण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे कालच्या बैठकीमध्ये संजय राऊत आणि नाना पटोले यांच्यामध्ये खटके उडाल्याची चर्चा आहे. जागा वाटपाची चर्चा पुढे जात नसल्याने शिवसेना ठाकरे गटाकडून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या भूमिकेविरोधात थेट काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करण्यात आल्याची माहिती सुत्रांनी दिली. विदर्भातील काही जागांवर तिढा अद्याप सुटलेला नाही, विदर्भातील तिढा असलेल्या जागांवर नाना पटोले अडून बसल्याची तक्रार ठाकरेंच्या नेत्यांनी काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडे केली आहे.

विधानसभा निडणुकांच्या अर्ज भरण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना या जागांवर लवकरात लवकर निर्णय व्हावा, असा प्रयत्न महाविकास आघाडी करत आहे. मात्र, नाना पटोले यांची भूमिका जागावाटप पूर्ण करत असताना अडचण निर्माण करणारी आहे, असे म्हणत ठाकरेंच्या नेत्यांनी काँग्रेस पक्ष श्रेष्ठींकडे हा विषय मांडला असल्याचं सुत्रांनी सांगितलं आहे. तसेच काँग्रेस हाय कमांडने तात्काळ निर्णय घेऊन जागावाटप पूर्ण करावं, अशी ठाकरेंची मागणी आहे. त्यामुळे, आता पुढे काय होईल हे पाहणे महत्वाचे आहे.

### प्रभाकर राघवन गुगलचे नवे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी

नवी दिल्ली : गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी उद्दुत चे वरिष्ठ उपाध्यक्ष प्रभाकर राघवन यांच्या नावाची मुख्य तंत्रज्ञ म्हणून घोषणा केलीय. प्रभाकर राघवन यांच्याकडं गुगल सर्च, असिस्टंट, जिओ, अ‍ॅड्स, कॉमर्स आणि पेमेंट्स उत्पादनांचा पदभार आहे.

प्रभाकर राघवन गुगलचे मुख्य तंत्रज्ञ : उद्दुत सध्या मायक्रोसॉफ्ट, ओपनएआय सारख्या कंपन्याशी स्पर्धा करत आहे. ग्राहकांच्या वर्तनात सतत होणारे बदल देखील स्पर्धेला वाव देत आहेत. त्यामुळेच गुगलनं मुख्य तंत्रज्ञ म्हणून प्रभाकर राघवन यांच्या नावाची घोषणा केलीय. याबात पिचाई यांनी म्हटंलय की, ''प्रभाकरन यांना स्वत:च्या कारकिर्दीत मोठी झेप घेण्याची वेळ आली आहे. ते १२ वर्षे उद्दुत मध्ये नेतृत्व करत आहेत. त्यामुळं त्यांची गुगलचे मुख्य तंत्रज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे.'' राघवन यांच्या नेतृत्वाखाली उद्दुत नॉलेज अँड इन्फॉर्मेशन (घ।ख) नवीन मॉडेल्स सक्षम करण्यास मदत होईल. तसंच गुगलच्या उत्कृष्ट उत्पादनाची गती वाढेल, असं पिचाई म्हणाले.

### मुंबईबाहेरील ८१ हजार घरांच्या प्रकल्पाला गिरणी कामागारांचा विरोध

**मुंबई/प्रतिनिधी :** गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांना मुंबईत घरे देणे शक्य नसल्याने त्यांना मुंबई महानगर प्रदेशात घरे देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार मुंबई महानगर प्रदेशात गिरणी कागमार आणि त्यांच्या वारसांसाठी ८१ हजार घरांची निर्मिती करण्यासाठी राज्य सरकार आणि दोन खासगी विकासक कंपन्यांमध्ये नुकताच करार करण्यात आला. पण गिरणी कामगार आणि गिरणी कागमार संघटनांनी मात्र मुंबईबाहेरील या ८१ हजार घरांच्या प्रकल्पाला विरोध केला आहे. ज्या जागांवर ही घरे बांधली जाणार आहेत, त्या जागा संघटना, गिरणी कामगारांनी नापसंत केली होती. असे असताना या जागांवर घरे बांधण्याचा निर्णय का घेण्यात आला, असा प्रश्न उपस्थित करून राज्य सरकार गिरणी कामगारांची फसवणूक करीत असल्याचा आरोप गिरणी कामगार संघटनांनी केला आहे. गिरण्यांच्या जमिनीवरील घरांच्या योजनेसाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाकडे कामगारांचे पावणेदोन लाख अर्ज सादर झाले आहेत. मात्र यापैकी २५ हजार कामगारांनाच मुंबईत म्हाडाच्या माध्यमातून घरे देता येणार आहेत. उर्वरित गिरणी कागमगारांसाठी मुंबईत जागा उपलब्ध नसल्याने दीड लाख गिरणी कामगारांना मुंबईबाहेर घरे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार राज्य सरकारने मुंबई महानगर प्रदेशातील काही जागा शोधल्या होत्या. गिरणी कागमार संघटनांनी पाहणी केल्यानंतर त्यापैकी काही जागा निश्चित केल्या होत्या. संघटनांनी पसंत केलेल्या जागांवर घरे बांधावी, असे गिरणी कामगारांना अपेक्षित होते. मात्र संघटनांनी नापसंत केलेल्या जागांवर घरे बांधण्याचा निर्णय मुंबई मंडळाने घेतला आहे.

## सक्तवसुली संचालनालयाकडून सत्येंद्र जैन यांना जामीन मंजूर

नवी दिल्ली : आम आदमी पक्षाचे नेते आणि दिल्लीचे माजी मंत्री सत्येंद्र जैन यांना मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीने मनी लाँड्रिंगच्या आरोपाखाली अटक केली होती. मात्र आता दिल्ली उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर झाला असल्याची माहिती आहे. ते १८ महिन्यातून तुरूंगातून बाहेर येणार आहे. न्यायालयाने ५० हजार जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. ज्यात आता न्यायालयाच्या परवानगीशिवाय तो देश सोडून जाऊ शकणार नाही अशी अटही घालण्यात आली आहे. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) जामीनाला विरोध दर्शवला आहे. मात्र आता न्यायालयाने त्यांच्यावर दिर्घकाळासाठी पाळत ठेवणार असल्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आहे. मनीष ससोदिया प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा हवाला देत जामीन मंजूर करण्यात आला आहे. आम आदमी पक्षाचे नेते सिसोदिया यांनी जामीनावर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, सत्येंद्र जैन यांना कोणताही आरोप केला नसताना तुरुंगात ठेवण्यात आले होते, परंतु सत्याचा विजय झाला असल्याचे ते म्हणाले आहेत.

## विद्यमान आमदारांना 'हरियाणा पॅटर्न'चा धसका, उमेदवार बदलणार, की राहणार, याबाबत भाजपचे 'नवे' निकष

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** हरियाणातील विजयामुळे भारतीय जनता पक्षाचा आत्मविश्वास दुणावला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीतही 'हरियाणा पॅटर्न' वापरण्याच्या हालाचाली भाजपकडून सुरू झाल्या असून, जातीय समीकरणांचा प्रभावी वापर केला जाणार असल्याचे समजते. तसेच सलग तीन वेळा आमदार झालेल्यांच्या कामगिरीचे मूल्यमापनही केले जाणार असल्याने अशा आमदारांची धाकधूक आता वाढली आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीतही भाजपला फटका बसेल, अशी चर्चा सुरू झाली होती. मात्र, काही दिवसांपूर्वी आलेल्या हरियाणातील निकालांमुळे भाजपचा आत्मविश्वास वाढला आहे. या निवडणुकीत सामाजिक आणि जातीय समीकरणे जुळविण्यात आली होती. ही बाब लक्षात घेऊन राज्यातही चमत्कार घडविण्याची तयारी भाजपकडून करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, आमदारांच्या कामगिरीचे मूल्यमापन होणार आहे. मूल्यमापनानंतरच निवडणुकीत पुन्हा संधी देण्याचा किंवा



न देण्याचा निर्णय होणार असल्याने तीन वेळा आमदार झालेल्या आणि पुन्हा उमेदवारीच्या प्रतीक्षेत असलेल्यांची धाकधूक वाढली आहे.


शहराचा विचार करता, पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ आणि खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर हे दोघे तीन वेळा आमदार झाले असून, चौथ्यांदा उमेदवारीसाठी इच्छुक आहेत. पण, हरियाणा पॅटर्नच्या निकषामुळे पर्वती आणि खडकवासला मतदारसंघातील येथील इच्छुकांनी जोर पकडला आहे. हरियाणा पॅटर्ननुसार, निवडणूक जिंकण्याची शक्यता ५० टक्क्यांपेक्षा कमी असलेल्या आमदारांची उमेदवारी ठरविण्याचे काम पक्षाची यंत्रणा करणार आहे. त्यासाठी बूथनिहाय नियोजन केले जाणार आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी विधानसभा निवडणुकीत विद्यमान आमदारांना तिकिटे नाकारण्याचे धोरण भाजपने स्वीकारल्याची चर्चा आहे. त्यामुळे अनेक विद्यमान आमदारांऐवजी नव्या उमेदवारांना संधी दिली जाणार आहे. पर्वती विधानसभा मतदारसंघाचे माधुरी मिसाळ सलग १५ वर्षे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यांना स्वपक्षातून आव्हान निर्माण झाले असून, माजी सभागृहनेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू श्रीनाथ भिमाले यांनी मिसाळ यांच्याविरोधात दंड थोपटले आहेत. भिमाले यांनी 'लढणार आणि जिंकणार' असा विश्वास व्यक्त केला आहे. तर, आमदार मिसाळ यांनी काही दिवसांपूर्वी मतदारसंघातील विविध विकासकामांची माहिती जाहीर करून पर्वतीमधूनच चौथ्यांदा उमेदवारी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला होता.

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीरही सलग तीन वेळा निवडून आले आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत तापकीर यांचा अवघ्या काही मतांनी निसटता विजय झाला होता. तापकीर यांना पुन्हा उमेदवारी देऊ नये, अशी मागणी सातत्याने पुढे येत आहे. भाजपच्या बैठकीतही त्यावरून खडाजंगी झाली होती. तसेच या मतदारसंघावर शिवसेनेने (शिंदे) दावा केला आहे. मात्र, हा मतदारसंघ भाजपकडे राहील, असा अंदाज आहे. त्यामुळे आमदारांच्या गेल्या १५ वर्षातील कामगिरीचे मूल्यमापन पक्षाकडून सुरू करण्यात आले आहे. त्याचा अहवाल वरिष्ठांना दिला जाईल. त्यानंतरच त्यांच्या उमेदवारीबाबतचा निर्णय होईल, अशी माहिती भाजपच्या पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

## जम्मू-काश्मीर येथे उमर अब्दुल्लाचे सरकार येताच दहशतवाद्यांचा उन्माद

### बिहारच्या अशोक चौहानची गोळ्या घालून हत्या



श्रीनगर : जम्मू-काश्मीर येथे उमर अब्दुल्लाचे सरकार येऊन काही दिवस झाले आहेत. नुकतीच उमर अब्बुल्लाने जम्मू-काश्मीरच्या मुख्यमंत्री पदाची शपथही घेतली. मात्र त्यानंतर आता जम्मू-काश्मीर येथे दहशतवाद्यांचे सावट निर्माण झाल्याची माहिती आहे. मात्र अशातच बिहार येथे राहणाऱ्या अशोक चौहान नावाच्या युवकावर गोळीबार करण्यात आल्याची माहिती आहे.

मिळालेल्या प्रसारमाध्यमानुसार, बिहार येथे अशोक चौहान यांची जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशात शोपियान जिल्ह्यात दहशतवाद्यांना गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. हे प्रकरण शुक्रवारी १८ ऑक्टोबर २०२४ रोजी घडले. त्यावेळी अशोकवर गोळीबार केल्याने मृतदेह जैनपोरा येथील वंदुना गावात अस्ताव्यस्त सापडला. प्रशासनाने मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून याप्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

अनंतनाग येथे राहणारा अशोक चौहान हे शोपियान येथे मका कापण्याचे काम करायचा. त्याच्या मित्रांनी सांगितल्याप्रमाणे, सकाळी अशोकचा फोन आला की आम्ही वेळ दवडण्यासाठी फिरायचो. मात्र बराच वेळ होऊन गेला मात्र अशोक पुन्हा आला नाही. त्यावेळी त्याच्या मित्रांनी त्याचा शोध सुरू केला आहे. काही वेळाने त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.

अलीकडे जम्मू-काश्मीर येथे स्थलांतरित मजुरांना लक्ष्य करण्यात आले आहे. मात्र या प्रकरणात जम्मू-काश्मीर प्रशासन काय भूमिका बजावेल याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.




# अजितदादांच्या राष्ट्रवादीला निवडणुकीच्या तोंडावर मोठा फटका?

## आधी ६०० आता २५०, पदाधिकाऱ्यांच्या राजीनाम्याचे सत्र सुरूच

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या राजीनाम्याचे सत्र सुरूच असल्याचे चित्र आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आणखी २५० पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत. पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांना विधान परिषदेवर संधी न दिल्यामुळे पदाधिकाऱ्यांची नाराजी कायम असल्याचं दिसून येत आहे. पक्षाच्या विविध पदांवरुन राजीनामे देणाऱ्यांची संख्या आता ८५० वर पोहोचली आहे.

राज्यपाल नियुक्त विधान परिषद सदस्य पदासाठी मानकर यांची वर्णी लागावी, यासाठी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी अजित पवार यांच्याकडे मागणी केली होती. मात्र, मानकर यांना डावलण्यात आले, परिणामी पहिल्याच दिवशी ६०० पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले. त्यानंतर आता आणखी २५० जणांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे आता ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अजित पवारांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

दिपक मानकर यांना विधान परिषदेवर संधी मिळेल अशी त्यांच्यासह कार्यकर्त्यांना अपेक्षा होती. मात्र, विधानपरिषदेवर संधी न मिळाल्याने दिपक मानकर यांच्या अनेक नाराज पदाधिकाऱ्यांनी राजीनामे देत रोष व्यक्त केला होता. त्यानंतर दिपक मानकर यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट केली होती.

गेल्या ४० वर्षापासून राजकीय आणि समाजिक जीवनात कार्य करत आहे. या संपूर्ण काळात राजकीय जीवनात अनेक पदं भूषवली आणि पदांना न्याय देण्याचं काम केलं. गेल्या दीड वर्षापूर्वी माझ्यावर पुणे शहर अध्यक्षपदाची जबाबदारी दिली आणि त्या पदाला न्याय देऊन विविध पक्षांतील पदाधिकारी, कार्यकर्ते पक्षासोबत जोडण्याचे काम केले आहे. त्याचबरोबर लोकसभेवेळी देखील त्यांनी मोठी मेहनत केल्याचे सांगितले. तर रुपाली चाकणकर यांना पुन्हा महिला आयोगाच्या अध्यक्षापदावर पुन्हा संधी देण्यात आली त्याबाबत देखील त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यानंतर आज नाराज असलेले दिपक मानकर अजित पवारांच्या भेटीसाठी सकाळी पक्ष कार्यालयात दाखल झाले होते.

राजीनामा सत्र आणि नाराजी या कारणांमुळे अजित पवारांची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. आज दीपक मानकर अजित पवारांना भेटण्यासाठी पोहोचले. अजित पवार येण्याआधीच दीपक मानकर पक्ष कार्यालयात हजर झाले होते. त्यानंतर रुपाली ठोंबरे देखील आज पक्ष कार्यालयात अजित पवारांची भेट घेणार आहेत. मानकर यांच्या कार्यकर्त्यांनी मानकरांना विधान परिषद मिळाली नाही म्हणून राजीनामा सत्र सुरू केलं आहे. तर दुसरीकडे रुपाली चाकणकर यांना सातत्यानं पक्षात पद दिली जात आहेत म्हणून रूपाली ठोंबरे यांनी पक्षावरच टीकेची झोड उठवली आहे. याबाबत आज दोन्ही नेते अजित पवारांची पक्ष कार्यालयात भेट घेत आहेत.



ऐन निवडणुकीच्या तोंडावर नाराजी आणि राजीनामा सत्र यामुळे पुन्हा एकदा पक्षाला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. अशातच रूपाली चाकणकर यांना दिली जाणारी पदे आणि जबाबदाऱ्या यावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला नेत्यांनी देखील यावेळी आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली आहे. अशातच निवडणुकीआधी सुरू झालेलं हे नाराजीनाट्य पक्षाची डोकेदुखी ठरू शकतं त्यावर अजित पवार आणि पक्षातील श्रेष्ठ नेते काय निर्णय घेणार ते पाहणंही महत्त्वाचं ठरणार आहे.

## तंत्रज्ञानाचा दुरुपयोग

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या कामासाठी केला पाहिजे मात्र काही महाभाग या तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करून समाजातील प्रतिष्ठित लोकांची विशेषतः सेलिब्रेटींची बदनामी करत आहे. सध्या फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडिया साईटवर सेलिब्रिटींचे त्यातही हिंदी आणि मनोरंजन सृष्टीतील अभिनेत्रींचे मॉर्फ केलेल्या अश्र्लील छायाचित्रांचा आणि व्हिडिओचा पूर आला आहे. हे छायाचित्र पाहिले की असे वाटते की हे छायाचित्र त्या अभिनेत्रींनीच काढून सोशल मीडियावर टाकले आहेत मात्र नीट पाहिले की लक्षात येते की हे छायाचित्र मोर्फ केलेले आहे. मागील वर्षी बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री असलेली रश्मीका मंधना हीचा डीपफेक व्हिडिओ प्रसार माध्यमात व्हायरल करण्यात आला होता. सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर कला क्षेत्रात चांगलीच खळबळ माजली होती. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर स्वतः अभिनेत्री रश्मीका हिने हा व्हिडिओ तिचा नसल्याचे सांगून व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून तिला मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे सांगितले होते. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर बिग बी अमिताभ बच्चन यांनीही संताप व्यक्त केला होता. सोशल मीडियावर व्हायरल झालेला व्हिडिओ हा एका दुसऱ्याच मुलीचा होता. मात्र एडिटिंग करून त्या मुलीच्या चेहरा लपवून त्याजागी अभिनेत्री रश्मीका मंधनाचा चेहरा लावण्यात आला होता. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर पोलीसातही तक्रार दाखल झाली होती तेंव्हा वाटले होते की या प्रकाराला आळा बसेल मात्र आळा बसणे तर दूरच उलट हा प्रकार वाढतच चालला असून सध्या तर अशा मॉर्फ केलेल्या छायाचित्रांचा आणि व्हिडिओजचा महापूर आला आहे. हे व्हिडिओ एडिटिंग करताना एआय या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. एआयच्या मदतीने व्हिडिओ आणि फोटो एडिट करून लोकांना त्रास दिला जातो. तंत्रज्ञानाने मानवी जीवनात क्रांती केली आहे. विज्ञानाच्या मदतीने दररोज नवे तंत्रज्ञान उदयास येत आहे. या तंत्रज्ञानाचा वापर मानवी कल्याणासाठी केला पाहिजे. विज्ञान तंत्रज्ञानाचा हेतू मानवी कल्याण हेच आहे मात्र काही नतद्रष्ट लोक या तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी नाही तर समाज विघातक कार्यासाठी करतात हा प्रकार त्यातलाच आहे. वास्तविक कोणाचाही फेक व्हिडिओ किंवा छायाचित्र बनवून बदनामी करणे हा गुन्हा आहे. अशा समाज विघातक लोकांना कायद्याने कडक शिक्षा व्हायलाच हवी. तंत्रज्ञानाचा दुरुपयोग ही नवीच समस्या आता निर्माण झाली आहे.

## निवडणूक/महत्वाचे

प्रति,
महोदय,
मा. संपादक / मा.जिल्हा प्रतिनिधी
दैनिक/साप्ताहिक--- / वाहिनी. बुलढाणा

विषय :- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४- माध्यम प्रतिनिधींच्या प्राधिकारपत्राबाबत..

विधानसभाच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी जिल्ह्यात दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान व दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणूकीचे वृत्त संकलन / छायाचित्र काढण्यासाठी मतदान तसेच मतमोजणी केंद्रामध्ये प्रवेश करण्यासाठी आपल्याकडील वृत्त संकलन करणाऱ्या प्रतिनिधींची नावे व त्यांची तीन रंगीत छायाचित्र जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा येथे दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत सकाळी ११.३० वाजेपर्यंत पाठवावी. उशीरा प्राप्त झालेल्या नावांचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी. सोबत संपादकांचे पत्र व ओळखपत्राची झेरॉक्सही सोबत पाठवावी.

कृपया खालील निवडणूक आयोगाकडून प्राप्त निर्देशाचे पालन व्हावे.

१. प्रत्येक शिफारशीसोबत संबंधीत व्यक्तीची पासपोर्ट आकाराची दोन छायाचित्रे पाठविणे आवश्यक आहे. छायाचित्राच्या मागे संबंधित व्यक्तीचे नाव लिहावे.

२. एकाच व्यक्तीला मतदान व मतमोजणी अशा दोन्ही केंद्रामध्ये प्रवेश हवा असल्यास, अशा व्यक्तींची तीन छायाचित्र देणे आवश्यक आहे.

३. प्राधिकारपत्र द्यावयाच्या व्यक्तीचे नाव, पदनाम व संबंधीत वृत्त संस्थेचे शिफारशीसह नाव हे मराठी व इंग्रजी ह्या दोन्ही भाषेत नमुद करावे.

४. छायाचित्रांच्या झेरॉक्स प्रती स्विकारल्या जाणार नाहीत.

५. प्राधिकारपत्रे द्यावयाच्या व्यक्तींची संख्या मर्यादित असावी.

कृपया उक्त माहिती वेळेत मिळावी, ही विनंती.
आपली स्नेहांकित,
**प्र. जिल्हा माहिती अधिकारी**
**बुलढाणा**

# गिरीश महाजनांचे निकटवर्तीय राष्ट्रवादीच्या वाटेवर

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ चे बिगुल वाजल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांमध्ये पक्षांची अदलाबदली सुरु असल्याचे चित्र आहे. आता नाशिकमध्ये भाजपमधून गळतीला सुरुवात झाल्याची दिसून येत आहे.

राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत सध्या जागावाटपावरून चर्चा सुरु आहेत. मात्र ज्या उमेदवारांना तिकीट मिळणार नाही अशी उमेदवारांनी दुसऱ्या पक्षात प्रवेश करून तिकिटासाठी फिल्डिंग लावायला सुरुवात केली आहे.

गणेश गीते शरद पवार गटाच्या वाटेवर

त्यातच आता नाशिकमध्ये भाजपमधून गळतीला सुरुवात झाल्याचे चित्र आहे. माजी स्थायी समिती सभापती आणि मंत्री



गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय गणेश गीते हे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाटेवर असल्याची माहिती समोर येत आहे. मुंबईत आज गणेश गीते जयंत पाटील आणि शरद पवारांची घेणार भेट आहेत. नाशिक पूर्व मतदारसंघातून गणेश गीते हे निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. नाशिक पूर्वमध्ये राहुल ढिकले हे भाजपचे विद्यमान आमदार आहेत. भाजपकडून उमेदवारी मिळत नसल्याने गणेश गीते हे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या वाटेवर आहेत. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

भाजपची पहिली यादी आज होणार?


दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून शुक्रवारी पहिली उमेदवारी यादी जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या यादीत १०० उमेदवारांचा समावेश असल्याची माहिती मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी भाजपच्या संसदीय मंडळाची बैठक झाली होती. या बैठकीत भाजपच्या १०० उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचे बोलले जात आहे. भाजपच्या पहिल्या उमेदवारी यादीतील १०० उमेदवारांची नावे निश्चित करताना गेल्या पाच वर्षांमधील त्यांची कामगिरी हा प्रमुख निकष होता. अनेक विद्यमान आमदारांच्या कामगिरीवर पक्ष नाराज आहे. त्यांच्याऐवजी संबंधित मतदारसंघात नव्या आणि तरुण चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. या यादीतून नेमकी कोणाला संधी मिळणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मी स्वतःला खूप भाग्यवान समजते ब्रेकअपच्या बातम्यांदरम्यान मलायका बोलली तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री-मॉडेल मलायका अरोरा नेहमीच चर्चेत असते. काही दिवसांपूर्वीच तिला अत्यंत कठीण टप्प्यातून जावे लागले, त्याचे कारण म्हणजे तिच्या वडिलांचा मृत्यू. बऱ्याच दिवसांपासून अशा गोष्टी समोर येत होत्या, त्यामुळे मलायका तिच्या पर्सनल आणि प्रोफेशनल लाइफमध्ये खूप गोंधळलेली असल्याचा अंदाज वर्तवला जात होता.

काही काळापूर्वी मलायकाचा तिचा बॉयफ्रेंड अभिनेता अर्जुन कपूरसोबत ब्रेकअप झाल्याच्या बातम्याही पसरल्या होत्या. पण अलीकडेच मलायका तिच्या आयुष्याविषयी मोकळेपणाने बोलली. मात्र, मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांनी कधीही त्यांच्या नात्याबाबत कोणतीही पुष्टी केलेली नाही. मात्र दोघांनाही अनेक कार्यक्रमांमध्ये एकत्र पाहिले गेले आहे.



नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत मलायकाने तिच्या आयुष्यात घेतलेल्या निर्णयांबद्दल बोलताना सांगितले की, सर्व निर्णय तिच्या आयुष्याला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. मलायकाने या काळातील जे काही सांगितले, ते सर्व अर्जुनसोबतच्या तिच्या ब्रेकअपच्या बातम्यांना आणखी बळ देते. ग्लोबल स्पा मॅगझिनशी झालेल्या संभाषणात मलायका म्हणाली की, माझा विश्र्वास आहे की मी कोणताही निर्णय घेतला आहे, मग तो वैयक्तिक असो किंवा व्यावसायिक, माझ्या आयुष्याला आकार देण्यात प्रत्येकाची भूमिका आहे. मी कोणताही पश्र्चात्ताप न करते जगते आणि मी स्वतःला खूप भाग्यवान समजते की गोष्टी ज्या प्रकारे घडल्या पाहिजेत.

या वर्षाच्या सुरुवातीपासूनच दोघांमध्ये ब्रेकअप झाल्याच्या बातम्या पसरू लागल्या होत्या, पण या बातमीला वेग आला, जेव्हा मलायकाने अर्जुनला त्याच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या नाहीत किंवा त्याच्या पार्टीला हजेरी लावली नाही.

# भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांनी रामायण या पवित्र ग्रंथाची निर्मिती करणारे महान आद्यकवी- मिसलवाड



**नांदेड/प्रतिनिधी :** आपल्या या भारत देशामध्ये, जगामध्ये मानव कल्याणासाठी अनेक संत, महंत, ऋषीमुनी होऊन गेले त्यापैकीच एक म्हणजे ५५०० वर्षांपूर्वी त्रेतायुगात भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांनी रामायण घडण्याअगोदर रामायण या पवित्र ग्रंथाची निर्मिती करणारे महान आद्यकवी म्हणजे भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी हे होत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. १७ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता रघुकुल रित सदा चली आयी, प्राण जाऐ पर वचन न जाई, रामायण महाकाव्य रचनाकार, संस्कृतचे आद्यकवी भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांची जयंती मोठ्या हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्त अभिवादन सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते.

सर्वप्रथम आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ते पुढे आपल्या भाषणात म्हणाले की, भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांनी २४ हजार श्र्लोक, ७ अध्यायामध्ये रामायण या ग्रंथाची रचना केली असून, पौराणामध्ये चार वेद, सहा शास्त्र, १८ पुराणांपैकी रामायण हा एक ग्रंथ असून याच ग्रंथावर आधारित प्रभू श्रीरामाच्या जीवनातील कालक्रमानुसार बालकांड, आयोध्याकांड, अरण्यकांड, सुंदरकांड, युद्धकांड, उत्तरकांड अशा सहा भागांमध्ये विभागले गेले असून आजघडीला आपण सर्वांनीच तुम्ही- आम्ही सर्वजण भगवान महर्षी वाल्मीकी ऋषी यांचा आदर्श घेऊन समाजाप्रती-देशाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक श्रीनिवास रेणके, पाळीप्रमुख मनोहर माळगे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वरिष्ठ लिपीक नितीन मांजरमकर, गुलाम रब्बानी सौ. रेखा माचीनवार, सुनीता हुंबे, प्रियंका खरात, वैष्णवी गंदेवार, वाहक दिगंबर जटाळे, चालक जी.पी. कोकरे, कृष्णा पवार, संजय मंगनाळे, शिवचरण मळगे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रा.प.म. आगारातील कामगार- कर्मचारी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.

# उंदरांना पकडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गोंदपट्ट्यांवरील बंदी रद्द करा, उच्च न्यायालयात याचिकेद्वारे मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** उंदरांना पकडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गोंदपट्ट्या या अमानवी आणि प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींविरोधात असल्याचे जाहीर करून भारतीय प्राणी कल्याण मंडळाने त्यांच्या वापरावर बंदी घातली आहे. मात्र ही बंदी मनमानी आणि कोणत्याही योग्य मूल्यांकनाविना घालण्यात आल्याचा दावा दोन कंपन्यांनी उच्च न्यायालयात धाव घेत केला आहे. तसेच बंदीबाबतचे ऑगस्ट २०११ सालचे परिपत्रक रद्द करण्याची मागणीही केली आहे.

गोंदपट्ट्या आणि इतर कीटक नाशक उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या गोमट्री ट्रॅप्स आणि अर्बुडा ॲग्रोकेमिकल्स या कंपन्यांनी ही याचिका केली आहे. त्याचप्रमाणे, आपल्या याचिकेवर निर्णय दिला जाईपर्यंत भारतीय प्राणी कल्याण मंडळाच्या परिपत्रकावर कोणतीही कारवाई न करण्याचे आदेश देण्याची मागणी केली आहे. गोंदपट्ट्यांवरील बंदीमुळे आपल्या व्यवसायावर नकारात्मक परिणाम होत असून आपण उत्पादित केलेल्या गोंदपट्ट्या या कीटक नियंत्रणासाठी प्रभावी आणि आवश्यक उपाय असल्याचा दावा कंपन्यांनी याचिकेत केला आहे. याशिवाय, एप्रिल २०२४ मध्ये आपण या गोंदपट्ट्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या घटकांबाबतचा सामग्री सुरक्षा तपशीलही सादर केला होता, असा दावा देखील याचिकाकर्त्या कंपन्यांनी केला आहे.

दरम्यान, अखिल भारत कृषी गौ सेवा संघातर्फे या प्रकरणी हस्तक्षेप याचिका दाखल करून गोंदपट्ट्या वापरावरील बंदीचा आदेश लागू करण्याची मागणी केली आहे. गोंदपट्ट्या या उंदीर पकडण्याचा सर्वात अमानवीय मार्ग असल्यामुळे उंदीर गंभीररित्या जखमी होतात किंवा त्यांचा मृत्यू होतो. या गोंदपट्ट्या अन्य प्राणी, पक्षी आणि लहान वन्यजीवांना देखील हानी पोहोचवू शकतात, असा दावा संस्थेने गोंदपट्ट्यांवरील बंदी लागू करण्याचे आदेश देण्याची मागणी करताना केला आहे. तसेच याच कारणास्तव लंडन, अमेरिका, जर्मनी आणि ऑस्ट्रेलियासह अनेक देशांमध्ये गोंदपट्ट्या वापरावर बंदी असल्याचा दावाही संस्थेने केला. या राष्ट्रांनी कीटक नियंत्रणासाठी काही मानवीय पर्याय स्वीकारले आहेत. इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीसारख्या इस्लामी देशांतही गोंदपट्ट्यांच्या अमानवी स्वरूपामुळे त्यांच्यावर बंदी घातली असल्याचे संस्थेने याचिकेत नमूद केले आहे.

# मतदार संघातील प्रत्येक युवकाला रोजगार देण्याचा मानस, आयोजक सिद्धार्थ खरात यांची माहिती : ३00 च्या वर युवकांना नियुक्तीपत्र

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर लोणार मतदार संघात रोजगाराच्या सुविधा उपलब्ध नसल्याने सुशिक्षित बेरोजगारांची फौज वाढत चालली आहे. शेतीत उत्पन्नाची हमी नाही, शेतकरी व शेतकरी पुत्राच्या हाताला काम नाही, यामुळे बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. येथील युवक हे इतर ठिकाणी रोजगाराच्या शोधात स्थलांतर करीत आहेत. हे मी गत काही महिन्यापासून पहात असल्याने मेहकर लोणार मतदार संघातील युवकांना रोजगार उपलब्ध करावा या उद्देशाने दिन.१८ ऑक्टोबर रोजी भव्य रोजगार मेळावा आयोजित केला होता.

या मेळाव्यात जवळपास २०० ते २५० च्यावर युवकांना नियुक्तीपत्र सुद्धा देण्यात आले आहेत .अशी माहिती उत्कर्ष प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा रोजगार मेळाव्याच आयोजक उबाठाचे नेते सिद्धार्थ खरात यांनी दिली.

उत्कर्ष प्रतिष्ठानच्या वतीने मेहकर येथील कृषी वैभव लॉन येथे दि.१८ ऑक्टोबर रोजी भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या रोजगार मेळाव्यासाठी महाराष्ट्रातील नामांकित ३५ ते ४० कंपन्यांना निमंत्रित करण्यात आले होते. या कंपन्याकडून जवळपास अडीच ते तीन हजार युवकांना रोजगार देण्यात येणार आहे.

या रोजगार मेळाव्यातून मेहकर लोणार मतदार संघातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.हा रोजगार मेळावा येथेच न थांबवता मेहकर




लोणार मतदार संघातील प्रत्येक गावातील प्रत्येक घरातील शेतकरी व शेतकऱ्यांच्या मुलांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी पुढील महिनाभर सुरू ठेवण्यात येणार आहे. मेहकर मतदार संघात कोणताही विकास न झाल्याने अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. शेतीला आग लागलेली आहे. शेतकऱ्यांच्या हाती अपेक्षित मोबदला मिळत नाही. शेतकऱ्यांच्या युवकांना रोजगार नाही अशा अनेक समस्यामुळे येथील युवक हा छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर आदी ठिकाणी रोजगाराच्या शोधात स्थलांतरित होत आहे. मेहकर मतदारसंघातील ही स्थिती यापुढे थांबावी, यासाठी रोजगार उपलब्ध रोजगार मिळावा आयोजित करून युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. मेहकर लोणार मतदार संघात विकास प्रत्यक्षात झाला नाही, मात्र कागदोपत्री व बॅनर बाजीवर विकासचे आकडे दाखविले जात आहेत. मतदारांची दिशाभूल करण्याचे काम केले जात आहे. मला ३० वर्षाचा अनुभव आहे. विकासाची उंची वाढवावी, यासाठी आम्ही मैदानात उतरलेलो आहे. मतदारसंघातील विकासाचा रोड मॅप आमच्याकडे तयार आहे.त्यानुसार आमचे काम सुरू आहे.अशी माहितीही यावेळी रोजगार मेळाव्या आयोजक उत्कर्ष प्रतिष्ठानचे अध्यक्ष, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेते सिद्धार्थ खरात यांनी दिली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मतदारसंघात चार हजार कोटींपेक्षा जास्त रकमेची विकासकामे

## आ. संजय रायमुलकर यांची पत्रकार परिषदेत माहिती

## एकनाथ शिंदे यांच्या धाडसी नेतृत्वाची आगामी काळातही गरज

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर लोणार मतदारसंघात चार हजार कोटींपेक्षा जास्त रकमेची विकासकामे करण्यात आले आहेत. तर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या नेतृत्वात मतदार संघात हजारो कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या धाडसी नेतृत्वाखाली लोकोपयोगी निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात घेतले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सारख्या धाडसी नेतृत्वाची गरज आगामी काळातही आहे.

महायुती सरकारच्या काळात राज्याचा जीडीपी ६.६ टक्क्याने वाढला आहे, अशी माहिती आ. संजय रायमुलकर यांनी दिली. ते येथील शिवसेना कार्यालयात दि.१८ ऑक्टोबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.





यावेळी आ.संजय रायमुलकर पुढे म्हणाले की, स्थिर किमतीवर आधारित जीडीपी दर हा विकासाच्या उन्नतीचे द्योतक असतो. महाविकास आघाडीच्या काळात १.९ टक्के असलेला जीडीपी महायुती सरकारच्या काळात ८.५ टक्के झाला. जीडीपीत ६.६ ने वाढणे, ही महत्त्वपूर्ण बाब आहे. या सरकारच्या काळात १० लाख ५२ हजार घरांची उभारणी करण्यात आली असून शबरी आदिवासी घरकुल योजनेसाठी ७७१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई, पीक विम्याची रक्कम, बचत गटांना सहाय्य ,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, रोजगार निर्मिती, महिला सशक्तिकरण, शेतकरी, युवक आणि इतर शेकडो योजना, आरोग्य, उद्योगधंदे, शहरी पायाभूत सुविधा आदी क्षेत्रात मोठे काम झाले आहे.

लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण झाले आहे. मेहकर विधानसभा मतदारसंघात चार हजार कोटींपेक्षा जास्त रकमेची विकास कामे झाली आहेत, असा दावा करून आमदार संजय रामुलकर म्हणाले की, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हॅम योजनेतून चारशे कोटींचे रस्ते, आशियाई बँक सहाय्यक ३९० कोटी चे रस्ते, ४३४ कोटींचा लोणार विकास आराखडा, जलजीवन योजना, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या योजना आणि मेहकर, लोणार शहर पाणीपुरवठा योजना यासाठी,५०२ कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत.

सभामंडप, संरक्षण भिंती, गावोगाव सिमेंट रस्त्यांची कामे, नाली बांधकाम, शादीखाने, स्मशानभूमी सौंदर्यीकरण, पेंटाकळी प्रकल्पाच्या कालव्यासाठी ५८५ कोटींची तरतूद, कोराडी प्रकल्पाच्या कालव्याच्या दुरुस्तीसाठी २६ कोटींची तरतूद अशी अनेकविध कामे विक्रमी संख्येत करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीची व पीक विम्याची मोठी रक्कम वेळोवेळी मिळवून दिली आहे.

अशी माहिती यावेळी आ. संजय रायमुलकर यांनी दिली. तसेच यावेळी ठोकळ महाराज, राजेंद्र गाडेकर ,गजानन सावंत यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी महायुती सरकारच्या रिपोर्ट कार्डचे प्रकाशन करण्यात आले.या पत्रकार परिषदेला शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख राजेंद्र गाडेकर, कृउबासचे सभापती माधवराव जाधव, तालुका प्रमुख सुरेश वाळूकर, बबनराव तुपे,शहर प्रमुख जयचंद बाठीया, युवा सेनेचे तालुका प्रमुख भूषण घोडे, पिंटू सुरजन, रामेश्र्वर भिसे, अशोक वारे, सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष अरुण दळवी, भाजपचे अड्.शिव ठाकरे, प्रल्हाद लष्कर, अक्षत दीक्षित, राहुल पवार, रोहित सोळंके, सारंग माळेकर, राकाँचे गजानन सावंत, प्रभाकरराव सपकाळ व मित्र पक्षाचे इतर पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. जयचंद बाठिया यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

संक्षिप्त...

## सी-व्हिजिल ॲपवर आचारसंहिता भंगाच्या ४२० तक्रारी प्राप्त, यापैकी ४१४ निकाली; १०६४ लक्ष रुपयांची मालमत्ता जप्त

दैनिक आपला विदर्भ





**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ साठी दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी आचारसंहिता लागू झाली आहे. १५ ते १८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण ४२० तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ४१४ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. यापैकी १०० मिनिटांत २५६ तक्रारींचा निपटारा करण्यात आल्या आहे. राज्यात ठाणे जिल्ह्यातील सर्वात जास्त तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.

विधानसभा निवडणुकीसाठीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण १०६४ लक्ष रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

## दिग्गज नेता पक्ष सोडण्याच्या तयारीत?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीने अद्याप उमेदवारी यादी जाहीर केलेली नाही. मात्र त्याआधी नाराजीनाट्य रंगत असल्याचं दिसत आहे. गणेश नाईक भाजपा सोडण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळत आहे. बेलापूर, ऐरोली मतदारसंघावर गणेश नाईकांचा दावा असून, जर या दोन्ही ठिकाणी उमेदवारी मिळाली नाही तर ते पक्षाला सोडचिठ्ठी देणार असल्याचं समजत आहे. यानंतर गणेश नाईक शरद पवारांच्या राष्ट्रवादी किंवा उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार का याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे.

संदीप नाईक हे दोन टर्मचे आमदार आहेत, विकासात्मक चेहरा आहेत. अभ्यासू आहेत. त्यांनी केलेला जनसामान्यांमधील संवाद आणि पक्षातील योगदान पाहता नक्कीच भाजपाने त्यांना उमेदवारी दिली आहे. संदीप नाईक यांना डावलण्यात येत आहे असं वातावरण दिसत आहे. त्यामुळे पदाधिकाऱ्यांना त्यांना कोणत्याही माध्यमातून बेलापूरची उमेदवारी घ्यायला लावायची आणि निवडून आणायचं हा चंग बांधला आहे असं भाजपा पदाधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

## नांदेड जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू!

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड जिल्ह्यात १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते २ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये नांदेड जिल्ह्यात उद्या सकाळी ६ वाजेपासून ते २ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

## रोहित पाटलांविरोधात संजयकाकांचा मुलगा रिंगणात उतरणार, प्रभाकर पाटील अजितदादांच्या भेटीला

**सांगली/प्रतिनिधी :** तासगाव -कवठेमहांकाळ विधानसभा निवडणुकीत महायुतीचा पेच अद्याप सुटला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या विरोधात मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचा (अजित पवार गट) उमेदवार निवडणूक रिंगणात उतरविण्याच्या हालचाली सुरू आहेत. भाजपचे माजी खासदार संजय पाटील यांचे पुत्र प्रभाकर पाटील विधानसभेच्या आखाड्यात उतरणार असल्याने त्यांना 'घड्याळ' हातात बांधावे लागणार असल्याची चर्चा आहे. यावर लवकरच शिक्कामोर्तब होईल. त्यामुळे रोहित पाटील व प्रभाकर पाटील अशी दुरंगी लढतीची शक्यता आहे.

प्रभाकर पाटील यांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी मोर्चेबांधणी केली आहे. त्यामुळे प्रभाकर पाटील निवडणुकीच्या आखाड्यात उतरणार हे निश्चित आहे. मात्र, महायुतीत हा मतदारसंघ भाजपशिवाय ज्या मित्रपक्षाच्या वाट्याला जाईल. त्या पक्षात प्रभाकर पाटील यांना प्रवेश करावा लागणार असल्याची चर्चा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडे या मतदारसंघात सक्षम उमेदवार नाही. त्यामुळे प्रभाकर पाटील लवकरच घड्याळ हातात बांधून राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. माजी खासदार संजय पाटील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुंबईत ठाण मांडून आहेत. त्यामुळे लवकरच मोठी राजकीय उलथापालथ पाहायला मिळणार आहे.

## नवाब मलिक, सना मलिक यांचं ठरलं! पिता-कन्या अजितदादांच्या पक्षाकडून निवडणूक लढवणार

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात राजकारणांचा फड चंगलाच रंगला आहे. पक्षांतराला पेव फुटले आहे. अनेक नेतेमंडळी तिकीट मिळण्याची शक्यता लक्षात घेता सोईच्या पक्षात प्रवेश करत आहेत. तर राज्यातील अनेक नेत्यांनी निवडणूक लढवण्यासाठी दंड थोपटले आहेत. दरम्यान, निवडणुकीच्या या रणधुमाळीत माजी मंत्री नवाब मलिक यांच्या भूमिकेकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. ते यावेळी पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार का? असे विचारले जात होते. असे असतानाच आता नवाब मलिक आणि त्यांची कन्या सना मलिक हे दोघेही विधानसभा निवडणूक लढवणार आहेत, असे सूत्रांकडून सांगितले जात आहे.

मिळालेल्या ताज्या माहितीनुसार नबाब मलिक आणि त्यांची कन्या सना मलिक हे दोघेही यावेळी विधानसभा निवडणूक लढवणार आहेत. नवाब मलिक हे शिवाजीनगर-मानखुर्दमधून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. तर अणुशक्ती नगरमधून सना मलिक या निवडणूक लढवणार आहेत. त्यासाठी तयारीदेखील चालू झालेली आहे. सना मलिक आणि नवाब मलिक हे दोघेही अजित पवार यांच्या पक्षाकडून म्हणजेच घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत.

मिळालेल्या ताज्या माहितीनुसार येत्या २८ ऑक्टोबर रोजी नवाब नवाब मलिक हे आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. तर त्यांची कन्या सना मलिक या २३ ऑक्टोबर रोजी आपला उमेदवारी अज दाखल करतील.

नवाब मलिक यांना ईडीने २०२२ मध्ये गोवावाला कंपाऊंड प्रकरणात अटक केली होती. तेव्हापासून ऑगस्ट २०२३ जामिनावर तुरुंगातून बाहेर पडले होते. याआधी क्रूझ ड्रग्ज प्रकरण त्यांनी चांगलंच उचलून धरलं होतं. त्यांनी आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. ईडीने कारवाई केल्यानंतर मात्र त्यांना तुरुंगात जावं लागलं होतं. दरम्यान, अजित पवार यांनी बंड केल्यानंतर नवाब मलिक नेमकं काय करणार? ते अजित पवार यांच्या पक्षात जाणार की शरद पवार यांच्यासोबत राहणार, असे विचारले जात होते. पण शेवटी त्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत जाणं पसंद केलं. त्यानंतर आता ते याच पक्षाकडून लेकसह निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत.

## अमित ठाकरेंना माहीमधून उमेदवारी द्या! मनसे नेत्यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कोणतीही युती आघाडी न करता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये एकला चलो रे भूमिका घेतली आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये सर्वाधिक उमेदवार देणार असल्याचे राज ठाकरे यांनी सांगितलं आहे. दरम्यान, काल (१८ ऑक्टोबर) शिवतीर्थवर झालेल्या बैठकीमध्ये राज ठाकरे यांना मनसे नेत्यांकडून अमित ठाकरे यांना माहीममधून उमेदवारी देण्यात यावी असा आग्रह धरण्यात आला. त्यामुळे अमित ठाकरे यांच्या संदर्भात राज ठाकरे कोणता निर्णय घेणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे. दरम्यान अमित ठाकरे यांच्या उमेदवारी संदर्भात पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये निर्णय होण्याची शक्यता आहे. जर राज ठाकरे यांनी अमित यांना माहीममधून उमेदवारी दिली, तर त्यांच्या विरोधात शिवसेना ठाकरे गटाने उमेदवार देऊ नये, असा मतप्रवाह आहे. सूत्रांनी यासंदर्भात माहिती दिली आहे.

आदित्या ठाकरे यांचा पैरा फेडला जाणार?



२०१९ मध्ये पहिल्यांदाच ठाकरे घराण्यातून आदित्य ठाकरे यांनी निवडणूक लढवली होती. त्यांनी वरळीमधून विजय मिळवला होता. त्यावेळी राज ठाकरे यांनी राजकारणापलीकडे कौटुंबिक नातं जपताना त्यांच्या विरोधात उमेदवार दिला नव्हता. त्यामुळे माहीममधून जर अमित ठाकरे यांना उमेदवारी देण्यात आली, तर ठाकरे गटाकडून सुद्धा उमेदवार देण्यात येऊ नये, असा एक मतप्रवाह शिवसेना ठाकरे आहे. अर्थात, या संदर्भातील सर्वाधिकार राज ठाकरे यांचा असणार आहे. अमित ठाकरे निवडणुकीच्या रिंगणात असतील की नाही याचे उत्तर पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये मिळण्याची शक्यता आहे.

## रब्बी हंगामासाठी पाणीपाळी सोडण्याचे नियोजन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) नांदेड या विभागांतर्गत असणाऱ्या निम्न मानार मोठा प्रकल्प, उर्ध्व मानार मध्यम प्रकल्प, करडखेड मध्यम प्रकल्प, कुंद्राळा मध्यम प्रकल्प, पेठवडज मध्यम प्रकल्प, महालिंगी मध्यम प्रकल्प, कुदळा मध्यम प्रकल्प, १ कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा व ५० लघु प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांना कळविण्यात आले आहे की, सदर नमूद प्रकल्पांवर रब्बी हंगाम सन २०२४-२०२५ राबविण्याचे नियोजित आहे.

सर्व धरणांत १५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या स्थितीनुसार पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असून, उपलब्ध पाणी साठ्याच्या अनुषंगाने प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात रब्बी हंगाम पूर्ण क्षमतेने राबविण्याचे नियोजित आहे. सदर नियोजनास आवश्यकतेनुरुप कालवा सल्लागार समितीची मंजूरी मिळाल्यानंतर त्याप्रमाणे पाणीपाळी सोडण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्यानुषंगाने सर्व संबंधित लाभधारकांना आवाहन करण्यात येते की, हंगाम सुरू होण्यापूर्वी खालील अटी व शर्तींची पूर्तता करावी.

रब्बी हंगामी, दुहंगामी व इतर बारमाही पिकांसाठी कालव्याचे प्रवाही/ मंजूर उपसा/ मंजूर जलाशय उपसा व मंजूर नदी, नाले उपसा सिंचनासाठी ज्यांना पाणी घ्यावयाचे आहे त्यांनी आपले पाणी मागणी अर्ज विहीत नमुन्यात (नमुना नबंर ७) दि.३१ ऑक्टोबर २०२४ पूर्वी संबंधित शाखा कार्यालयात माहिती भरून सादर करावेत. पिकांचे मागणी क्षेत्र २० आरच्या पटीत असावे. कालवा संचलन कार्यक्रमानुसारच पाणी घेणे बंधनकारक राहील. पाणीपट्टी नभरणाऱ्या व पाणी अर्ज नामंजूर असलेल्या लाभधारकास सिंचनासाठी पाणी देणे या कार्यालयास बंधनकारक राहणार नाही. काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रिक कारणास्तव पाणी पुरवठा करणे शक्य न झाल्यास होणाऱ्या नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. लाभधारकांनी दिवस व रात्रीच्या वेळेस पाणी घेणे बंधनकारक आहे. रात्रीच्या वेळेस पाणी न घेतल्यामुळे पाणी नदीनाल्यास वाया जाऊन ठराविक मुदतीत पाणी न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. दि. २९ मार्च २०२२ च्या शासन निर्णयातील प्रचलित दरानुसार पाणीपट्टीचे दर आकारण्यात येतील. थकीत व चालू पाणीपट्टी वेळेत भरुन सहकार्य करावे.

शेतचारी स्वच्छ व दुरुस्त ठेवण्याची जबाबदारी संबंधित लाभधारकांची राहील. उडाप्याच्या अंतिम क्षेत्रास पाणी पुरवठा करणे बंधनकारक राहणार नाही. पाणीपाळी सुरू असताना जबरदस्तीने अथवा विनापरवानगी विद्युत मोटारी, ट्रॅक्टर द्वारे पाणी उपसा केल्यास अथवा गेट उघडल्यास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. जे लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करण्यात आले आहे त्या लाभक्षेत्रावर नियमानुसार पाणी मागणी, वसूली आणि सिंचनाचे नियंत्रण पाणी वापर संस्थेने करावे. अन्यथा पाणी पुरवठा केला जाणार नाही, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग (द) चे कार्यकारी अभियंता आ. शि. चौगले यांनी केले आहे.

# महावितरणच्या मेहकर विभागीय कार्यालय स्थापनेला मंजुरी प्रदान

## आमदार संजय रामुलकर यांच्या प्रयत्नांना यश : मेहकर, लोणार, सिंदखेडराजा व देऊळगाव राजा तालुक्यांचा वीजवितरण चा कारभार मेहकर विभागीय कार्यालयातून चालणार

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** महावितरणच्या खामगाव विभागीय कार्यालयाचे विभाजन करण्याची मागणी आमदार संजय रायमुलकर यांनी लावून धरली होती. आता महावितरणच्या मुख्यालयातून मेहकर विभागीय कार्यालय स्थापनेस मंजुरी प्रदान करण्यात आली असून, मेहकर विभागीय कार्यालया अंतर्गत मेहकर, लोणार, सिंदखेडराजा, देऊळगावराजा या चार तालुक्यांचा कारभार चालणार आहे. नवीन विभागीय कार्यालयाच्या स्थापनेसाठी महावितरणने २६ लाख ३९ हजार रुपये प्रशासकीय खर्चास मंजुरी दिली आहे. पदनिर्मितीच्या खर्चासाठी एक कोटी ९९ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.



महावितरणच्या मुंबई मुख्यालयात महावितरण चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अरविंद भादीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत काल पार पडलेल्या बैठकीत मेहकर विभागीय कार्यालयाच्या स्थापनेस मंजुरी देण्यात आली आहे. मागील महिन्यात आमदार संजय रायमुलकर यांनी अरविंद भादीकर यांची मुंबई येथे भेट घेऊन मेहकर विभागीय कार्यालयाच्या स्थापनेबाबत त्वरित निर्णय घेण्याची मागणी केली होती. लोणार येथे २२० के व्ही उपकेंद्राची निविदा प्रक्रिया आहे पूर्ण झाली आहे. तिथे विज उपकेंद्राची उभारणी केली जाणार आहे.

इकडील चार तालुक्यातील वीज ग्राहकांना प्रत्येक वेळी खामगाव येथे जावे लागत होते. त्यामुळे मेहकर येथे विभागीय कार्यालय स्थापन करण्याची मागणी आमदार संजय रायमुलकर यांनी दीर्घ काळापासून लावून धरली होती. मेहकर विभागीय कार्यालयातून मेहकर ,लोणार, सिंदखेडराजा व देऊळगावराजा तालुक्याचा वीज वितरणचा कारभार चालणार आहे. महावितरण खामगाव विभागीय कार्यालया अंतर्गत आता खामगाव, खामगाव ग्रामीण, शेगाव व संग्रामपूर वीज उपविभागीय कार्यालये चालणार असून बुलढाणा उपविभागात बुलढाणा, चिखली, धाड व उदयनगर उपविभागीय कार्यालयांचा कारभार चालणार आहे. नव्या मेहकर विभागीय कार्यालय उभारणीसाठी २६ लाख ३९ हजार रुपयांच्या प्रशासकीय खर्चास मंजुरात देण्यात आली असून मेहकर येथे कार्यकारी अभियंता ,अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता व चार सहाय्यक अभियंता यांच्यासह एकूण ३८ पदे मंजूर करण्यात आली आहेत.





यात ३६नियमित व दोन बाह्य स्त्रोत अशा ३८ पदे स्थापनेस मंजुरी देण्यात आली आहे. खामगाव विभागीय कार्यालयात अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांना मेहेकर विभागीय कार्यालयात नियुक्ती देऊन समायोजित करण्यात येणार आहे. मेहकर, लोणार, सिंदखेडराजा, देऊळगाव राजा या चार तालुक्यातील नागरिकांना आता खामगाव येथे जाण्याची गरज पडणार नाही, मेहकर विभागीय कार्यालयातून त्यांना सेवा मिळणार असल्याने जास्त अंतराचा भुर्दंड पडणार नाही. त्यामुळे वीज ग्राहकांनी आमदार संजय रायमुलकर यांचे अभिनंदन केले आहे.

# देशी दारुची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर पथकाची कारवाई; २१ बॉक्ससह दोन आरोपी अटकेत

दैनिक आपला विदर्भ







**बुलडाणा/प्रतिनिधी** : देशी दारुची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत धडक मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत गुरुवारी मोताळा ते नांदुरा दरम्यान विनापास परवाना अवैध देशी दारुची वाहतूक करणाऱ्या दोन आरोपींसह अटक करुन त्यांच्याकडून एकूण १ लाख २३ हजार ५९० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क खामगांवचे निरीक्षक व्हि.एम पाटील यांनी दिली आहे.

दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ रोजी दुय्यम निरीक्षक, खामगाव -२ यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मोताळा ते नांदुरा दरम्यान पवन एकनाथ तायडे या नावाचा इसम विनापास परवाना अवैध देशी दारुची वाहतूक करणार आहे. सदर बातमीनुसार कायदेशीर कार्यवाही करण्याकरिता व बातमीची शहानिशा करण्याकरिता बातमीदाराने सांगितलेल्या ठिकाणी दुय्यम निरीक्षक, खामगाव-२ यांनी स्टाफ व पंचांसह जावून त्या ठिकाणी बातमीदाराने दिलेल्या बातमीनुसार सापळा रचून पाळत ठेवली असता पवन एकनाथ तायडे रा. शेंबा ता. मोताळा जि. बुलढाणा यास एका मोटार सायकलवरुन देशी दारुची अवैध वाहतूक करतांना पकडले. त्याचे ताब्यातुन मोटार सायकलसह देशी दारु टैंगो पंच ९० मिलीची ७०० बाटल्यांचा साठा जप्त करण्यात आला. मुद्देमालाची एकूण किंमत ७४ हजार ५९० रुपये आहे.

सदर आरोपीकडून अधिक माहिती घेवून मौजे शेंबा येथील सागर भगवान भिडे याचे राहते घरी छापा टाकला असता आरोपीच्या राहते घरी देशी दारुच्या ९० मिलीचे १४ बॉक्स अवैधरित्या विक्रीसाठी बाळगून असता मिळून आला. त्याचे ताब्यातून एकूण ४९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर गुन्ह्यात सहभागी अमोल भगवान भिडे मिळून आला नाही. आरोपींकडून गुन्ह्यात एकूण १ लाख २३ हजार ५९० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच अमोल भगवान भिडे हा इसम फरार झाला आहे. सदर आरोपींविरुद्ध दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खामगाव-२ कडे महाराष्ट्र दारुबंदी कायद्या अंतर्गत कलम ६५ अ, ई व ८३ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, विभागीय उप आयुक्त अर्जुन नाना ओहाळ जिल्हाधिकारी डॉ. श्री. किरण पाटील, अधीक्षक डॉ. पराग नवलकर यांचे मार्गदर्शनाखाली श्रिनरीक्षक व्हि. एम. पाटील, निरीक्षक बोज्ञावार, दुय्यम निरीक्षक दत्तात्रय कुटेमाटे, दुय्यम निरीक्षक माकोडे, दुय्यम निरीक्षक शिंदे, जवान अमोल सोळंके, परमेश्र्वर चव्हाण, शारदा घोगरे, नितीन सोळंकी, प्रमोद पिंपळे, मोहन जाधव, अमोल सुसरे यांनी केली. गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक दत्तात्रय कुटेमाटे, राज्य उत्पादन शुल्क करीत आहेत.

## रिसोड शहरात गायींची वासरे चोरणारी टोळी सक्रिय

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : शहरात मागील काही दिवसापासून गाईची लहान वासरे चोरणारी टोळी सक्रिय झाली आहे वसाहती मधील नागरिकांच्या निदर्शनास आल्यास त्वरित पोलीस स्टेशनची संपर्क करावा असे आवाहन गौप्रेमीनी केले आहे सदाशिव नगर मध्ये काही नागरिकांनी दिनांक १६ ऑक्टोंबर रोजी लहान वासराची सुटका केली आहे.

शहरांमध्ये मागील काही वर्षापासून मोकाट गाई गुरांची संख्या वाढली आहे यामध्ये काही गाई शहरातील नागरिकांच्या मालकी च्या आहेत महिला भगिनी गाईंना नैवेद्य व इतर शिळे पदार्थांचे खायला घालतात त्यामुळे जास्त गाई नवीन वसाहतीमध्ये फिरत राहतात महानंदा नगरी ते छत्रपती शिवाजी नगर या नवीन वसाहतीमध्ये जास्तीत जास्त चाकरमाने राहत आहेत दुपारच्या वेळी ह्या नवीन वसाहती सुमसान राहतात याच संधीचा फायदा घेत दुपारच्या वेळी काहीजण भंगारवाल्या सारखा ऑटो घेऊन फिरत असतात १६ ऑक्टोंबर रोजी सदाशिवनगर मध्ये एका गायीच्या वासराला पकडताना तेथील नागरिकांनी पाहिले सुरुवातीला ही गाय व वासरू आमचीच आहे अशी म्हणून त्यांनी हुज्जत घातली परंतु त्यानंतर इतर नागरिक गोळा होताच त्यांनी तिथून पळ काढला याआधी सुद्धा अनंत कॉलनी मधून अशाच प्रकारे वासरू ओढत नेल्याची माहिती आहे गाई दिसत आहेत परंतु त्या मागे फिरणारी वासरे दिसत नसल्याचे निदर्शनास येत आहे शहरात गाईंची लहान वासरे चोरणारी टोळी सक्रिय झाल्याचे दिसून येते आहे यानंतर शहरात कुठेही गाय किंवा वासरू पकडत असताना निदर्शनास आल्यास त्वरित पोलीस स्टेशनची संपर्क करावा असे आवाहन गोप्रेमींनी केले आहे.

## पोखरा योजनेत रिसोड तालुक्यातील २७ गावांची निवड; पाच वर्ष मिळणार शेतकऱ्यांना विविध लाभ

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : नानाजी देशमुख कृषि संजीवनी योजना जि पोखरा नावाने ओळखली जाते कृषी संजीवनी असलेली तसेच राज्यात सर्वात मोठा कृषी उपक्रम असलेली पोखरा ही योजना भाग दोन महाराष्ट्र शासनाने पुन्हा सुरू केली आहे या योजने मध्ये रिसोड तालुक्यातील २७ गावांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र सरकार कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,शासन निर्णय क्रमांक १४ ऑक्टोबर, २०२४ मध्ये नमूद करण्यात आले आहे की नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या यशस्वीतेमुळे राज्याच्या इतर जिल्ह्यांमधील गावांचा या प्रकल्पामध्ये समावेश करण्याची मागणी विचारात घेऊन दिनांक २८ जून, २०२३ रोजीच्या मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार दिनांक ३० जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये सद्यः स्थितीत समाविष्ट असलेल्या एकूण २१ जिल्ह्यांमध्ये अंदाजित रु.६००० कोटी (रुपये सहा हजार कोटी) किंमतीच्या जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्यास शासनाची तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्यें रिसोड तालक्यातील पवारवाडी, वाडी वाकद ,वाकद,




जांबअढाव, कोयळी बु,कोयळी खु, गोवर्धन, नावली, शेलगाव राजगुरे, मसलापेन, केशवनगर, वाघी खु. दापुरी खु. चिचांबा पेन, येवता, पार्डीतिखे, खडकी ढंगारे, बेलखेडा, हिवरापेन , येवतती, वारूडतोफा, कोयळी बु.कोयळी खु. व्याड, चिचांबाभर अशा एकूण २७ गावाची पोखरा या योजनेत निवड झाली असल्याने या गावातील शेतकऱ्यांना या योजनेचा सतत पाच वर्ष फार मोठा लाभ मिळणार आहे .

## कृषी कन्यांनी दिली बँकेला भेट




दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला सलग्नित कृषी महाविद्यालय, रिसोड येथील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम व कृषी औद्योगिक जोड २०२४-२५ या अंतर्गत कृषीकन्या निकिता शेंदूरकर, साक्षी बुरडे, माया भुसारी, प्रांजली खिराडे, श्र्वेता जाधव, सलोनी फरतोडे आणि धनश्री नरवाडे यांनी कृषी कर्जाबद्दल माहिती घेण्यासाठी बँकेला भेट दिली. यावेळी बँकेतील कर्मचाऱ्यांनी बँकेविषयी व पीक कर्ज विषयी महत्त्वाची माहिती दिली व त्यासाठी लागणारे कागदपत्र नियम व अटी विषयी संपूर्ण माहिती त्यांनी दिली. यासाठी कृषी महाविद्यालय रिसोड चे प्राचार्य डॉ. आशिष अष्टुरकर, तांत्रिक समन्वयक आर.एस. डवरे, कार्यक्रम समन्वयक डी. डी. मसुरकर, कार्यक्रम अधिकारी जी. बी. बाजड व तसेच विषय विशेषतज्ञ के. एम. वानखडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

## दुचाकीची चोरी करणारी टोळी पोलिसांच्या जाळ्यात; २३ मोटार सायकलीसह नऊ लाखाचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ





**बुलडाणा/प्रतिनिधी** : खामगाव येथून चोरी गेलेल्या दुचाकीचा तपास करीत असताना पोलिसांच्या जाळ्यात दुचाकी चोरी करणारे चार चोरटे अडकले.पोलिसांनी या चोरट्यांना बेड्या ठोकून चोरीच्या २३ दुचाकीसह एकूण ९ लाखाचा मुद्देमाल जप्त केला. अशी माहिती बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी दि.१८ ऑक्टोबर रोजी बुलढाणा येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

बुलढाणा जिल्हामध्ये मोटार सायकल चोरी गेलेल्या गुन्हांची गंभीर दखल घेवून बुलढाणा पोलिस मोटार सायकल संबंधीत गुन्ह्याची उकल करत असताना ४ आरोपी निष्पन्न झाले. त्यातील अकोला जिल्ह्यातून तीन आरोपी तसेच नांदेड जिल्हा ता.माहूर येथून एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. अकोला जिल्ह्यातील २४ वर्षीय आरोपी विशाल दुर्योधन इंगळे, २५ वर्षीय अंकीत प्रमोद मुलनकर तसेच नांदेड जिल्ह्यातील ३१ वर्षीय विकास बबनराव मोरे व ३८ वर्षीय सिध्दार्थ श्रावण खरात या चार आरोपींना अटक केली आहे.

या दुचाकी चोरट्याने बुलढाणा, वाशीम, अमरावती, वर्धा, नागपूर,जळगाव, हिंगोली या जिल्ह्यातून दुचाकी चोरी करून विक्री केली असल्याची माहिती आहे. तर आरोपींच्या ताब्यातील हिरो स्प्लेंडर कंपनीच्या १७ मोटार सायकल, हिरो एचएफ डीलक्स कंपनीच्या ४ मोटार सायकल आणि होंडा ॲक्टीव्हा कंपनीच्या २ मोटार सायकल असे एकूण ९ लाख रुपयांच्या २३ मोटारसायकल जप्त केल्या असल्याची माहिती बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी दिली आहे.

### चोरीचे गुन्हे उघड होण्याची शक्यता

दुचाकी चोरट्यांनी बुलढाणा व आजुबाजुच्या जिल्ह्यातील दुचाकीची चोरी करून त्या दुचाकीची दुचाकी गॅरेजसह ग्रामीण भागात विक्री केली असल्याची चर्चा आहे. या दुचाकी चोरट्यांचे जिल्ह्या जिल्ह्यात जाळे पसरलेले असून एका ठिकाणाहून दुचाकी चोरी करून दुसर्या जिल्ह्यात सदर दुचाकी पोचविली जाते.नंतर चोरीची दुचाकी करणारे दलाल सदर दुचाकीची ग्रामीण भागात किंवा भंगार व्यावसाय किंवा ग्रामीण भागात टॅक्टरसाठी डिझेल पुरविण्यासाठी त्या दुचाकीची विक्री करतात. हे जाळे बुलढाणा जिल्हास वाशीम, अकोला व आजुबाजुच्या जिल्ह्यात पसरलेले आहे. त्या दृष्टीने अधिक तपास केल्यास चोरीच्या इतर गुन्ह्याची उकल होण्याची शक्यता आहे.

## विविध वृत्त...

### जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रात फुटबॉलचे प्रशिक्षण; खेळाडूंनी लाभ घ्यावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने फुटबॉल खेळाचे जिल्हा प्रशिक्षण केंद्र जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, बुलढाणा येथे दि. २२ ऑक्टोंबर २०२४ पासुन सुरुवात होत आहे. या प्रशिक्षण केंद्रात खेळाडूंना तंत्रशुध्द मार्गदर्शन विनामुल्य मिळणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी, खेळाडूंनी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.

प्रशिक्षण केंद्र सायंकाळी ५ ते ७ वाजेदरम्यान सुरु राहिल. सदर प्रशिक्षण केंद्र कार्यान्वीत करण्याकरीता क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे यांचेमार्फत राज्य क्रीडा मार्गदर्शक(एन.आय.एस.) डॉ.जिवन मोहोड यांची बुलढाणा येथे नियुक्ती करण्यात आलेली आहे. खेळाडूंना तंत्रशुध्द मार्गदर्शन विनामुल्य प्रशिक्षण मिळणार असून याचा लाभ जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थी, खेळाडूंनी घ्यावा.

### सामाजिक कार्यकर्ते संतोष दराडे यांना राज्यस्तरीय समाज गौरव सेवा कार्य पुरस्कार जाहीर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार** : सिंदखेडराजा तालुक्यातील हिवरखेड पूर्णा येथील सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे युवा कार्यकर्ते संतोष अंबादास दराडे यांची राज्यस्तरीय समाज गौरव सेवा कार्य पुरस्कारासाठी निवड झाली आहे .त्याबाबतचे पत्र अनुश्री महिला बहुउद्देशीय संस्था येथील अध्यक्षा सौ जयश्रीता इंगळे यांनी दिली आहे . संतोष दराडे कष्टकरी शेतकरी विधवा ' विद्यार्थी तसेच शोषित पीडित समाजातील घटकांना न्याय देण्याकरता नेहमीच आंदोलने शासकीय स्तरावर पाठपुरावा करत असतात ,अनेकांना ती मदत सुद्धा करत असतात याच कार्याची दखल घेण्यात आली आहे . दराडे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे .



### निवडणूक आचारसंहितेतही मिळणार आनंदाचा शिधा!

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : विधानसभेची आचारसंहिता लागू झाल्याने रेशन दुकानातून आनंदाचा शिधा मिळणार का असा संभ्रम नागरिकांमध्ये होता. मात्र आंनदाच्या शिधाची पिशवी वगळून शिधामधील संपूर्ण रेशन कार्ड धारकांना मिळणार असल्याचे पुरवठा विभागाने सांगितले आहे.

दोन महिन्यात ५ लाख २७ हजार ३४२ लाभार्थ्यांपैकी ३ लाख १७ हजार ७४३ लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला आहे. तर उवर्रीत २ लाख ९ हजार ५९९ लाभार्थ्यांना किट वाटपाची प्रक्रिया सुरू आहे. सणासुदीत रेशनकार्ड धारकांना शासनाकडून केवळ शंभर रूपवात आनंदाचा शिधा दिला जाते. यामध्ये १ किलो साखर, १ किलो तेल, १ किलो, रवा व १ किलो हरभरा दाळीचा समावेश आहे. गणेश चतुर्थी निमित्य नागरीकांना या आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय शासनाने घेतला. परंतु प्रत्यक्षात गणेश उत्सव झाल्यानंतर आनंदाचा शिधा प्राप्त झाला आहे. त्यामुळे या उत्सवाचा शिधा वाटप सुरू असतानाच मंगळवारी विधानसभेची आचारसंहीता लागू झाली. पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे फोटो असलेल्या पिशवीमध्ये आनंदाचा शिधा वाटप केल्या जातो. त्यामुळे विधानससभेच्या निवडणुकीची आचारसंहीता सुरू असल्याने हा शिधा वाटप होईल का असा संभ्रम नागरीकांमध्ये निर्माण झाला होता. परंतु यावर पर्याय काढत त्या राजकीय पिशवीविनाच कार्डधारकांना शिधामधील साहीत्य देण्यास काही हरकत नसल्याचे स्पष्टीकरण पुरवठा विभागाकडून देण्यात आले आहे.

जिल्ह्यात ५ लाख २७ हजार ३४२ आनंदाचा शिधाचे लाभार्थी असुन सप्टेंबर, ऑक्टोबर या दोन महीन्यात ३ लाख १७ हजार ७४३ शिधाचे वाटप करण्यात आले आहे. प्रतिक्षेत असलेल्या २ लाख ९ हजार ५९९ लाभार्थ्यांना या किटचे वाटप त्या राजकीय पिशवीविना सुरू आहे. दिवाळीचा शिधा मात्र अप्राप्त सद्या सुरू असलेला आनंदाचा शिधा वाटप हे गणेशउत्सवाकरीता आलेले आहे. जिल्ह्याला ते दशीरा प्राप्त झाल्याने अद्यापही अर्ध्या रेशनकार्ड धारकांना या शिधाचे वाटप झाले नाही. परंतु १५ दिवसांवर दिवाळी सण असुन याचे धान्य आणि शिधा अद्यापही अप्राप्त आहे. त्यामुळे दिवाळीची शिधा केव्हा मिळणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### ऋषभ पंतच्या दुखापतीबाबत मोठे अपडेट, तो बंगळुरु कसोटीत पुढे खेळू शकेल की नाही?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : बंगळुरू कसोटीच्या दुसऱ्या दिवशी टीम इंडियासाठी काहीही चांगले घडले नाही. प्रथम त्यांची फलंदाजी शक्ती निघून गेली. त्यानंतर ऋषभ पंतच्या दुखापतीमुळे डोकेदुखी वाढली. पंतच्या दुखापतीमुळे टीम इंडियाचा तणाव वाढणार आहे, कारण ज्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती, त्याच गुडघ्याला दुखापत झाली आहे. आता ऋषभ पंतच्या दुखापतीची स्थिती काय आहे, हा प्रश्न आहे. बंगळुरु कसोटीत तो पुढे खेळू शकेल की नाही? अशा प्रश्नांची उत्तरे कर्णधार रोहित शर्माने दुखापतीबाबत दिलेल्या अपडेट्सवरून समजू शकतात.